**दिनांक १६/११/२०१९ रोजी शपथेवर उलटतपास सुरु**
**प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. एस.जी.पणदूरकर यांचेमार्फत**

२. माझा जन्म १९५७ साली झाला. सन १९८३ मध्ये माझे वय २४ वर्षे होते. माझे शपथपत्रातील मजकूर मी वाचला आहे. दिनांक २८/०६/१९८३ रोजीचे बक्षीसपत्र मी पाहिलेले आहे. हे बक्षीसपत्र मला वादी विष्णू गिरी यांनी दाखविले आहे. हे बक्षीसपत्र त्यांनी मला माझे पुराव्याचे शपथपत्र करणेपूर्वी सात ते आठ दिवस अगोदर दाखविले. माझे शपथपत्र दिनांक १७/१०/१९ रोजी दाखल केले आहे आणि त्यापूर्वी सात ते आठ दिवस अगोदर मी हे बक्षीसपत्र पाहिले आहे. हे बक्षीसपत्र कोणी लिहीले आहे हे मला माहीत नाही. या बक्षीसपत्रामध्ये कोणते सर्व्हे नंबर, हिस्सा नंबर, मिळकती व सिटी सर्व्हे नंबर आहेत हे मला माहीत नाही. या बक्षीसपत्रावर माझी सही नाही. या बक्षीसपत्रावर कोण साक्षीदार आहेत हे मला माहीत नाही. साक्षीदार सांगतो की, साक्षीदारांबाबत माझे लक्षात नाही. हे बक्षीसपत्र त्या दिवशी माझे समक्ष झालेले नाही. हे बक्षीसपत्र कोठे लिहीणेत आले याबाबत त्यावेळेस मी हजर नसल्यामुळे सांगू शकत नाही.

३. महादेव गिरी यांचे निधन सन १९९२ ते १९९३ दरम्यान झाले. ते मयत झाले त्यावेळेस मी त्यांचे घरी गेलो नव्हतो. महादेव गिरी यांची पत्नी म्हणजेच वादी व प्रतिवादी यांच्या आईला ते ज्या ठिकाणी रहातात त्याच ठिकाणी त्यांचे दफन करणेत आलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी त्यांना दफन करणेत आले होते तो भाग लोकवस्तीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझेसहीत त्या ठिकाणी रहाणारे लोकांची हा दफन विधी करणेस हरकत होती. हे म्हणणे खरे आहे की, या दफन विधीबाबत न्यायालयात केस झाली तसेच पोलीस, तहसिलदार यांचेकडे देखील कार्यवाही झाली. साक्षीदार सांगतो की, मा. उच्च न्यायालय येथे रीट पिटीशन देखील दाखल करणेत आले होते. याबद्दल सावंतवाडी न्यायालयात देखील फौजदारी केस झाली होती याबद्दल मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी श्रीकृष्ण यांचे त्यावेळी असे म्हणणे होते की, त्यांचे आईचा दफन विधी त्या ठिकाणी करणेचा त्यांचा हक्क आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा सर्वांचे असे म्हणणे होते की, सावंतवाडी येथे स्मशानभूमी असल्यामुळे दफन विधी द्वारे अंत्यसंस्कार त्या ठिकाणी करता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची अशी हरकत असून

देखील प्रतिवादी श्रीकृष्ण यांनी आमच्या हरकतीस विरोध करुन जबरदस्तीने त्या ठिकाणी दफन विधी केला होता. ज्या ठिकाणी ही दफन विधीची घटना घडली होती तेथे ब्राम्हण समाजाची वस्ती आहे आणि मी देखील ब्राम्हण समाजापैकी आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्रीकृष्ण यांनी आमचे म्हणणे ऐकले नाही म्हणून आमचा त्याचेविरुध्द राग होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २८/०६/१९८३ रोजी महादेव गिरी यांनी बक्षीसपत्रातील मजकूर माझेसमोर सांगितला असे घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २८/०६/१९८३ रोजी बक्षीसपत्र झाल्याचे मी विष्णू गिरी म्हणत असल्यामुळे सांगत आहे. मी त्या बक्षीसपत्रावरील दुय्यम निबंधक यांचा शिक्का पाहीला होता आणि माठेवाडयामध्ये या बक्षीसपत्राबाबत चर्चा झाली होती म्हणून असे बक्षीसपत्र झाल्याचे मी सांगत आहे. अशी चर्चा वादीचे वडील सन १९९२—१९९३ मध्ये वारल्यानंतर झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, देवस्थानचे कामकाज प्रतिवादी क्र. १ हा पाहतो. दावा इमल्याचा नंबर मला माहीत नाही. दावा इमल्याचा नंबर वादी विष्णू याने सांगितल्यामुळे शपथपत्रामध्ये नमूद आहे. माझे शपथपत्रातील मजकूर विष्णूने सांगितला, परंतु तो कोठे टाईप करुन घेणेत आला याबद्दल मी सांगू शकत नाही. माझा पेपर विक्रीचा व्यवसाय असून त्याचा दुकानगाळा वादीचे विधिज्ञांच्या ऑफिसपासून ५० फूटावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरुन शपथपत्रावर सही केली आहे. वादीचे माठेवाडा, सावंतवाडी येथे जनरल स्टोअर्स हे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, या दुकानापासून माझे घर जवळ असल्यामुळे मी वादीच्या दुकानात खरेदी करतो आणि माझे त्याचेकडे येणे जाणे आहे. माझा नारळ विक्रीचा देखील व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझेकडे नारळ विक्रीला घालतो आणि ते मी विकतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे व वादीचे संबंध जिव्हाळयाचे आहेत.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकूर खोटा असून वादीला मदत करणेकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

**<u>प्रतिवादी क्र. २ विरुध्द एकतर्फा आदेश आहे.</u>**

**<u>प्रतिवादी क्र. ३ व तर्फे विधिज्ञ ॲड श्री.प्रभू आजगांवकर यांना पुकारता गैरहजर सबब त्याचेकरीता कायदेशीर मुद्दयांबाबत उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by Rupali Rajanikant Bedagkar
Date: 2019.11.16 16:01:48 +0530

(आर.आर.बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

दिनांक :—१६/११/२०१९.